


# पारनेर दर्शन




वर्ष ३ अंक ७१, गुरुवार ६ फेब्रुवारी २०२५ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# कुकडी नदीपात्रात बुडून तरुणाचा मृत्यू

## तिसऱ्या दिवशी मृतदेह सापडला । लोणावळयाच्या शिवदुर्ग मंडळाच्या प्रयत्नांना यश । शिरापुर येथील दुर्घटना

**शिरापुर : प्रतिनिधी**

**पाणी उपसण्यासाठी कुकडी नदीपात्रात टाकण्यात आलेली पाणबुडी मोटार दुरूस्तीसाठी नदीपात्रात उतरलेल्या राहुल मनाजी निकम वय ३० या तरूणाचा दुर्दैवी मृत्यू झाला. सोमवारी सायंकाळी राहुल नदीपात्रात उतरल्यानंतर तो बुडाला तिसऱ्या दिवशी बुधवारी सायंकाळी लोणावळा येथील शिवदुर्ग मित्र मंडळाच्या सदस्यांनी पाणबुडीच्या मदतीने शोध घेऊन त्याचा मृतदेह पाण्याबाहेर काढला.**

यासंदर्भात मिळालेल्या माहीतीनुसार राहुल निकम हा शिरापुर व परीसरातील शेतकऱ्यांकडे मोलमजुरीचे काम करून उपजिविका चालवत होता. सोमवार दि. ३ फेब्रुवारी रोजी शेतकरी रामेश्वर बेलोटे यांच्या शेतामध्ये कामासाठी गेला होता. दिवसभराचे काम आटोपल्यानंतर बेलोटे यांची कुकडी नदीपात्रातून पाणी उपसण्यासाठी टाकलेली पानबुडी बंद पडली असल्याने तीच्या दुरूस्तीसाठी बेलोटे व राहुल हे नदीपात्राकडे गेले. बेलोटे हे नदीपात्राच्या वर उभे होते तर राहुल हा मोटार दुरूस्तीसाठी नदी पात्रात उतरला.

राहुल हा नदीपात्राच्या तळाशी तो पाण्याबाहेर आलाच नाही. काही वेळ वाट पाहून बेलोटे यांनी आजूबाजूच्या शेतकऱ्यांसह मा. सरपंच हनुमंत भोसले यांना घटनास्थळी पाचारण केले. त्यांनी त्याचा शोध घेण्याचा प्रयत्नही केला मात्र राहुल मिळून आला नाही. मा. सरपंच भोसले यांनी लोणावळा येथील शिवदुर्ग मित्र मंडळाच्या सदस्यांशी संपर्क केल्यानंतर त्यांनी थोडी वाट पहा असा सल्ला देण्यात आला. मंगळवारी दिवसभर राहुल याचा शोध घेण्यात येत होता मात्र राहुल सापडू शकला नाही.बुधवारी दुपारच्या सुमारास शिवदुर्ग मित्र मंडळाची टीम शिरापुरमध्ये दाखल झाली. त्यांनी अथक प्रयत्न करत गाळामध्ये रूतून बसलेला राहुल याचा मृतदेह सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास पाण्याबाहेर काढण्यात यश मिळविले.



■ लोणावळा येथील शिवदुर्ग मित्र मंडळाच्या टीमने कुकडी नदीपात्रात शोधकार्य करून राहुल निकम याचा मृतदेह शोधण्यात यश मिळविले.

### थंड पाण्यामुळे मृतदेह वर येऊ शकला नाही

मोटार दुरूस्तीसाठी नदीपात्राच्या तळाशी गेलेला राहुल पानबुडी मोटारजवळच्या गाळात रूतून बसला होता. नदीपात्रातील पाणी थंड असल्याने त्याचा रूतून बसलेला मृतदेह फुगून वर येऊ शकला नाही. असे शिवदुर्गच्या टीमकडून सांगण्यात आले.

### नगर येथे शवविच्छेदन

मृतदेह पाण्याबाहेर काढण्यात आल्यानंतर पारनेर पोलीसांनी पंचनाम्याचे सोपस्कार पुर्ण केले. त्यानंतर राहुल याचा मृतदेह शविच्छेदनासाठी नगर येथील जिल्हा रूग्णालयात पाठविण्यात आला.

### राहुल पट्टीचा पोहणारा

राहुल हा पट्टीचा पोहणारा होता. त्यामुळेच त्याने नदीपात्रात उतरून पानबुडी दुरूस्तीसाठी पुढाकार घेतला होता. मात्र नदीपात्राच्या तळाशी असलेल्या गाळामध्ये तो रूतून बसल्याने त्याला त्याचा जीव गमवावा लागला.

### शिवदुर्गाच्या टीमचे यश

लोणावळा येथील शिवदुर्ग मित्र मंडळाचे सुनील गायकवाड, महेश म्हसणे, अनिल आंधळे, सागर कुंभार, योगेश दळवी, कुणाल कडू व चंद्रकांत गाडे यांच्या टीमने नदीपात्रात होडीच्या मदतीने राहुल याचे शोधकार्य केले. सुरूवातीस गळ टाकून शोध घेण्यात आला. त्यात यश न आल्याने पाणबुडीची मदत घेऊन राहुल याचा मृतदेह शोधण्यात शिवदुर्गाच्या टीमला यश आले.

### २४ तास वाट पहा

शिवदुर्ग मित्र मंडळाच्या सदस्यांना या दुघटनेबाबत कळविण्यात आल्यानंतर २४ तास वाट पहा. पाण्यातील मृतदेह फुगून वर येईल असे सांगण्यात आले होते. मात्र थंड पाण्यामुळे मृतदेह वर येऊ शकला नाही. शिवदुर्गाच्या सदस्यांनी सुरूवातीस गळ टाकून राहुल याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यात त्यांना यश न आल्याने त्यांनी पाणबुडीच्या मदतीने नदीपात्राच्या तळाशी जाउन पानबुडीजवळील गाळात रूतून बसलेल्या राहुल याच्या मृतदेहाचा शोध घेण्यात यश मिळविले.

# पारनेर बसस्थानकाचे खा. लंके यांच्या हस्ते भूमिपूजन

## २ कोटी ६६ लाख रूपयांचा निधी मंजुर । ४० वर्षानंतर उभी राहणार नवी वास्तू

**पारनेर : प्रतिनिधी**

**खासदार नीलेश लंके यांच्या पाठपुराव्यानंतर मंजुर करण्यात आलेल्या पारनेर येथील बसस्थानकाचे रविवार दि.९ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता खा. लंके यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात येणार असल्याची माहिती पारनेरचे नगराध्यक्ष नितीन अडसूळ व उपनगराध्यक्ष जयदा शेख यांनी दिली.**



पारनेर बसस्थानक सन १९८५ मध्ये बांधून पुर्ण झाल्यानंतर ४० वर्षांच्या कालखंडानंतर बसस्थानकाची वास्तू उभी राहणार आहे. बसस्थानकाच्या स्वच्छता गृहाच्या बाजूला असलेल्या मोकळया जागेत हे बसस्थानकाची वास्तू उभी राहणार असून हे बांधकाम झाल्यानंतर जुन्या बसस्थानकाचे निर्लेखन करण्यात येणार आहे. त्यानंतर त्या जागेवर बीओटी तत्वावर व्यापारी संकुल उभे राहणार आहे.

राज्यात महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर आल्यानंतर खा. नीलेश लंके यांनी पारनेर व सुपा बसस्थानकासाठी नवी इमारत तसेच व्यापारी संकुलासाठी पाठपुरावा सुरू केला होता. कोरोना संकटामध्ये दोन वर्षे त्यात खंड पडला.

सन २०२० पासून सन २०२४ पर्यंत खा. लंके यांनी या कामासाठी पत्रव्यवहार केला. त्यांच्या प्रयत्नांना यश येऊन या कामासाठी २ कोटी २५ लाख रूपयांचा निधी मंजुर होऊन राज्य परिवहन महामंडळाकडून निविदा प्रक्रिया पुर्ण करण्यात येऊन १५ मार्च २०२४ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला. पुढे काही तांत्रीक अडचणी निर्माण झाल्याने हे काम सुरू होउ शकले नाही. त्यामुळे खा. नीलेश लंके यांनी दि.२१ जानेवारी २०२५ रोजी राज्य परिवहन महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांकडे पत्रव्यवहार करून रखडलेल्या कामाकडे लक्ष वेधले होते. कामाला विलंब झाल्याने २ कोटी ६६ लाख रूपये अंदाजपत्रक असलेल्या कामास मंजुर देण्यात आली. रविवारी या कामाचे भूमिपूजन करण्यात येणार आहे.

# तंत्रनिकेतन संस्थांमध्ये अधिव्याख्यात्यांची नियुक्ती करा

## खासदार नीलेश लंके यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**अहिल्यानगर : प्रतिनिधी**

**शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयांमध्ये अभ्यागत अधिव्याख्यात्यांच्या नियुक्तीअभावी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून ते टाळण्यासाठी अभ्यागत अधिव्याख्यात्यांच्या तातडीने नियुक्त्या कराव्यात अशी मागणी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे खासदार नीलेश लंके यांनी पत्राद्वारे केली आहे.**



मुख्यमंत्र्यांना पाठविलेल्या पत्रात खा. लंके म्हणतात, शासकीय तंत्रनिकेतन संस्थांमध्ये तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी नियमित अधिव्याख्याते तसेच अभ्यागत अधिव्याख्याते महत्वपुर्ण भूमिका बजावत असतात. तथापि, सध्या न्यायालयीन प्रकरणामुळे मागील सत्रापासून तंत्र शिक्षण संचालनालयाने अभ्यागत अधिव्याख्याते यांच्या नियुक्तीस मनाई केली आहे.

### अधिव्याख्यात्यांवर अतिरिक्त ताण

अभ्यागत अधिव्याख्याते नियुक्त न केल्याने नियमित अधिव्याख्याते यांच्यावर अतिरिक्त ताण येत आहे. परिणामी अध्यापनाच्या गुणवत्तेत घट होण्याची शक्यता आहे.

### विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान

शासकीय तंत्रनिकेतनांमध्ये शिकणारे विद्यार्थी गुणवंत असून त्यांना दर्जेदार शिक्षण मिळणे अत्यंत आवष्यक आहे. मात्र अध्यापन कर्मचारी अपुऱ्या संख्येने असल्याने त्यांच्या शिक्षणावर प्रतिकूल परिणाम होत आहे.
या परिस्थितीची गांभीर्याने दखल घेऊन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेता आणि गुणवत्तापुर्ण शिक्षण प्रदान करण्याच्या उद्देशाने, शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयांमध्ये अभ्यागत अधिव्याख्याते यांच्या नियुक्तीस परवानगी देण्यात यावी अशी विनंती खा. लंके यांनी पत्राद्वारे केली आहे.

### अभ्यागतांचे आर्थिक नुकसान


अनेक सक्षम व अनुभवी अधिव्याख्याते या निर्णयामुळे रोजगारापासून वंचित आहेत. त्यांच्या उपजिविकेवरही परिणाम झाला आहे.

# संत तुकारामांचे वंशज शिरीष महाराजांची आत्महत्या

## आर्थिक परिस्थितीला कंटाळून संपवले जीवन आत्महत्या करण्यापूर्वी लिहिली चिठ्ठी

**देहू : प्रतिनिधी**

**संत तुकाराम महाराजांचे अकरावे वंशज शिरीष महाराज मोरे यांनी गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. शिरीष महाराज यांनी यांनी आज (बुधवारी) सकाळी राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले. शिवव्याख्याते म्हणून मोरे यांचा मोठा नावलौकीक होता.**



शिरीष महाराज यांनी आज सकाळी राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले. आत्महत्येचे ठोस कारण समोर आले नसले तरी यामागे आर्थिक विवंचना हे कारण असल्याचे बोलले जात आहे. येत्या २० फेब्रुवारीला त्यांचा विवाह होता. त्यापूर्वीच महाराजांनी हे पाऊल उचलण्याने देहूवासीयांना मोठा धक्का बसला आहे.
शिरीष महाराज यांनी अलीकडेच नवीन घर बांधले होते. त्यांच्या घराच्या खालच्या मजल्यावर आई-वडील राहत होते, तर ते स्वतः वरच्या मजल्यावर राहत होते. मंगळवारी रात्री ते आपल्या खोलीत झोपण्यासाठी गेले. मात्र, आज सकाळी ८:३० वाजल्यानंतरही ते खाली आले नाहीत. घरच्यांनी दरवाजा ठोठावला, पण आतून काहीच प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे जबरदस्तीने दार तोडून पाहिले असता, त्यांनी पंख्याच्या हुकाला उपरण्याने गळफास घेतल्याचे निदर्शनास आले.शिरीष महाराज यांनी आत्महत्येपूर्वी एक चिठ्ठी लिहून ठेवली आहे, ज्यामध्ये त्यांनी आर्थिक विवंचनेमुळे आत्महत्या करत असल्याचा उल्लेख केला आहे. पोलिसांनी या पत्राचा तपशील गोळा केला असून, प्राथमिक तपास सुरू आहे. त्यांच्या मोबाईलचा डेटा संपूर्णपणे फॉरमॅट करण्यात आला असल्याने तपास अधिक गुंतागुंतीचा बनला आहे. घटनेची माहिती मिळताच देहूरोड पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी प्राथमिक तपासात ही आत्महत्या आर्थिक विवंचनेतून झाल्याचा उर्वरीत पान ३ वर

# कोणीही असो प्रत्येकावर कारवाई होणारचं !

## मुख्यमंत्री फडणवीस यांचा बीडमधून इशारा

**बीड : प्रतिनिधी**

**"स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या खुनाची घटना अतिशय दुर्दैवी आहे. या हत्येसारख्या घटना खपवून घेतल्या जाणार नाहीत. याप्रकरणी मग कोणीही असो प्रत्येकावर कारवाई केली जाईल, असा विश्वास मी तुम्हाला देतो."असे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बीडकरांना आश्वासीत केले.**

बीडमधील आष्टी उपसा सिंचन योजना क्र.३ अंतर्गत येणार्या शिंपोरा ते खुंटेफळ पाईपलाईन कामाची पाहणी आज देवेंद्र फडणवीसांनी केली. यावेळी बोगदा कामाचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी देवेंद्र फडणवीसांनी जोरदार भाषण केले. या भाषणावेळी त्यांनी संतोष देशमुखांची हत्या करणाऱ्यांवर नक्कीच उर्वरीत पान ३ वर











# तंत्रमंत्र

विज्ञानयुगातील बितंबातम्या

# क्लाउड कॉम्प्युटिंग ठरतंय आयटी क्षेत्राचे भविष्य!

**क्लाउड कॉम्प्युटिंगमुळे आयटी क्षेत्रात झपाट्याने प्रगती होत आहे. त्यामुळे क्लाऊड कॉम्प्युटिंग हे आयटी क्षेत्राच्या उज्वल भविष्यासाठी कारणीभूत ठरेल, असे तज्ञांकडून सांगितले जात आहे.**

सोप्या भाषेत सांगायचे झाले तर, क्लाऊड कॉम्प्युटिंग ही एक अशी व्यवस्था आहे जी आपण आपल्या व्यवसायाशी निगडित कॉम्प्युटरवर करत असलेले काम किंवा महत्त्वाच्या नोंदी आभासी पद्धतीने साठवून ठेवते. हे एक अद्वितीय तंत्रज्ञान आहे जे इंटरनेट कनेक्शन असल्यास कधीही आणि कुठेही वापरता येऊ शकते. आयटी क्षेत्रात क्लाउड कॉम्प्युटिंग इतके अपरिहार्य का ठरत आहे याची कारणे आपण जाणून घेऊया...


## सुधारित डेटा स्टोरेज तंत्रज्ञान

अधिकाधिक लोक विविध IT साधने आणि सेवा वापरत असल्याने डेटा निर्मिती वेगाने वाढत आहे. हा डेटा सायबर हल्ल्यांपासून सुरक्षित ठेवण्यासाठी सुरक्षित आणि विश्वासार्ह तंत्रज्ञानाची गरज आहे. भौतिक डेटा केंद्रे राखणे अधिक कठीण होत आहे. भौतिक नोंदी ठेवणेदेखील वेळखाऊ आणि खर्चिक होत आहे. येथेच क्लाउड तंत्रज्ञान उपयुक्त ठरत आहे. क्लाउड-आधारित डेटा स्टोरेज केंद्रे आज बाजारात मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहेत. डेटा सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी व्यावसायिक त्यांच्या गरजेनुसार क्लाउड तंत्रज्ञान वापरू शकतात. स्वयंरोजगार असलेल्या व्यक्ती देखील वर्कफ्रॉम होम करण्यासाठी क्लाउड तंत्रज्ञान सेवा वापरत आहेत.

## ॲडव्हान्सड् सायबर सुरक्षा

सायबर सुरक्षा ही क्लाउड कॉम्प्युटिंगमध्ये आघाडीवर आहे. क्लाउड सर्व्हर विविध प्रकारच्या सायबर हल्ल्यांपासून संरक्षण देण्यासाठी डिझाइन केलेले आहेत. पूर्वी, जे व्यवसाय स्वतंत्र डेटा स्टोरेज सर्व्हर ठेवत असत त्यांना त्यांच्या आयटी बजेटचा मोठा भाग सायबर सुरक्षेसाठी तयार करावा लागत असे. परंतु आता क्लाउड कॉम्प्युटिंगमुळे, सुरक्षितपणे डेटा संग्रहित करणे सोपे झाले आहे. क्लाउड कॉम्प्युटिंगमधील बी.टेक तुम्हाला या क्षेत्रात योग्य शैक्षणिक पाया तयार करण्यात मदत करू शकते.

## पॉकेट-फ्रेंडली तंत्रज्ञान




क्लाउड तंत्रज्ञान हे एक पॉकेट फ्रेंडली तंत्रज्ञान आहे. क्लाउड स्टोरेज स्पेस या संबंधित व्यवसायानुसार, वैयक्तिकृत केल्या जाऊ शकतात. क्लाउड कॉम्प्युटिंग हे आयटी क्षेत्राचे भविष्य असण्यामागे हे एक मुख्य कारण आहे. सायबर गुन्ह्यांचे प्रमाण वाढल्याने, लोकांना सुरक्षित परंतु तरीही पॉकेट-फ्रेंडली डेटा स्टोरेज पर्यायांची सध्या नितांत गरज आहे. जे क्लाऊड कम्प्युटिंगमुळे सहज शक्य होते.

## दूरस्थ प्रवेशयोग्यता

बहुराष्ट्रीय कंपन्यांमधील अनेक कर्मचारी हे जगातील विविध देशांमधून काम करत असतात. त्यामुळे स्टोरेज सुविधांमध्ये डेटाचा मोठा भाग राखणे अत्यावश्यक बनले आहे. ज्यामुळे जगाच्या कोणत्याही भागातून काम करणाऱ्या कंपनीच्या कर्मचाऱ्याला संबंधित कंपनीच्या विशिष्ट डेटापर्यंत सहज पोहोचता येईल. एक मोठा फायदा म्हणजे कामात अडथळा येत नाही आणि कर्मचाऱ्यांना जगाच्या कोणत्याही भागातून काम करण्याचे स्वातंत्र्य मिळते.

# सगळं काही क्लाऊडमध्ये...



क्लाऊड कॉम्प्युटिंग हे मोबाइल आणि कॉम्प्युटरचं जीवन आहे, असं विधान आजकाल आपल्याला सहज ऐकायला मिळतं. तसा क्लाऊड कॉम्प्युटिंगचा गेल्या काही वर्षांत लोकांमध्ये बऱ्यापैकी प्रसार झाला आहे.

**परंतु अजूनही बऱ्याच लोकांना क्लाऊड म्हणजे काय, याची फारशी माहिती नसते. उंच पर्वतांवर ढगांमध्ये तुमचा लॅपटॉप घेऊन बसणे म्हणजे क्लाऊड कॉम्प्युटिंग का ? किंवा मग रॉकेट किंवा विमानात बसून कॉम्प्युटिंग करणे म्हणजे क्लाऊड कॉम्प्युटिंग का ? आपण क्लाऊड कीबोर्डवर प्रत्यक्षात टाइप करू शकतो का ? याचा आपल्याला काही उपयोग होऊ शकतो का, असे अनेक प्रश्न आपल्या मनात येणे साहजिक आहे, म्हणूनच जाणून घेऊ या आपल्याला क्लाऊड कॉम्प्युटिंग सुविधा कशाप्रकारे वापरता येऊ शकते ? कोणती सुविधा वापरावयाची ? क्लाऊड कॉम्प्युटिंग म्हणजे काय ?**

क्लाऊड कॉम्प्युटिंग म्हणजे आपल्या गरजेची माहिती दूरच्या कोणत्या तरी कॉम्प्युटरवर साठवणे जी माहिती आपल्याला कधीही जगाच्या कुठल्याही कोपऱ्यातून सहजरीत्या मिळवता येऊ शकते. क्लाऊड म्हणजे तो दूरवरचा कॉम्प्युटर आणि त्या कॉम्प्युटरशी म्हणजेच क्लाऊडशी कनेक्ट होण्यासाठी बऱ्याचदा फक्त इंटरनेट असले की पुरेसे ठरते. याचे साधे-सोपे उदाहरण म्हणजे जी-मेल, गुगल ड्राइव्ह, ड्रॉपबॉक्स... यावर आपण आपली माहिती टाकून जतन करून ठेवू शकतो.

## क्लाऊड कॉम्प्युटिंगचा उपयोग काय ?

तसे याचे फायदे बरेच असतात. समजा तुमच्या एखाद्या फॅमिली फोटोची एकच कॉपी तुमच्या कॉम्प्युटरवर असेल आणि काही कारणास्तव तुमचा कॉम्प्युटर बंद पडला किंवा तुमचा फॅमिली फोटो जर कायमचा डिलीट झाला तर तुमच्या आठवणी पुन्हा कधीच पाहता येणार नाहीत पण जर तोच फोटो जर तुम्ही क्लाऊडवर अपलोड केलात तर तो तुम्हाला कधीही जगाच्या कुठल्याही कोपऱ्यातून मिळवता येऊ शकतो. मोठी फाईल शेअर करणे हा क्लाऊडचा सर्वात मोठा फायदा समजला जातो. समजा, तुमच्याकडे असलेला तुमच्या लग्नाचा व्हिडीओ दूर राहणाऱ्या मित्राला दाखवायचा आहे परंतु तुम्ही तो मेल करू शकत नाही. कारण त्याला मर्यादा असते मग अशा वेळी आपण आपला व्हिडीओ क्लाऊडवर अपलोड करायचा आणि त्याची लिंक मित्राला पाठवायची आणि तुमचा मित्र सहजरीत्या तो व्हिडीओ पाहू शकतो. (तो ते क्लाऊड वापरत नसला तरी हे शेअरिंग करता येते)

आपण सहा जण मिळून एखाद्या प्रोजेक्टवर काम करीत आहात आणि सगळ्यांना मिळून प्रेझेंटेशन तयार करावयाचे आहे. परंतु आपण सारे वेगवेगळ्या ठिकाणी राहत असाल तर क्लाऊड तुमची मदत करू शकतो. म्हणजे क्लाऊडवरच प्रोजक्ट तयार करायचा आणि सहा जणांना फाईल शेअर करायची. प्रत्येक जण आपल्या सोयीनुसार त्यात हवे ते इनपुट्स देऊ शकतो आणि त्यावर चर्चादेखील करू शकतो. मोठा बिझनेस असणाऱ्या कंपन्यांना याचा खूप फायदा होतो. एकाच वेळी अनेक ग्राहकांना सेवा सुरळीतपणे पुरविण्यासाठी मोठमोठे सव्र्हर मशीन्स एकाचवेळी चालविणं गरजेचं असतं. ते कंपनीसाठी अतिशय खर्चीक काम ठरतं, पण क्लाऊडमुळे अनेक कंपन्यांचा सव्र्हर चालविण्याचा व त्यांच्या मेन्टेनन्ससाठीचा खर्च वाचविता येतो. शिवाय क्लाऊड ॲक्सेसेबल, तसंच कमी खर्चीक असून, तो पूर्ण कार्यक्षमतेने सेवा पुरवितो. यामध्ये काही धोकेदेखील असू शकतात. पण त्यांचे प्रमाण फारच कमी आहे.

## क्लाऊड काम कसे करते. ?


क्लाऊडचे कार्य समजावून घेण्यासाठी एक उदाहरण बघू या. आपल्या सगळ्यांकडे इलेक्ट्रिसिटी आहे. पण वीज तयार करणारे मोठमोठे टर्बाइन्स, मॅग्नेट्स, तारा आपल्या घरात असण्याची आपल्याला गरज नसते. कारण आपल्या घरात येणारी वीज आपल्याला तयार करावी लागत नाही. ती आपल्यासाठी कुणी तरी दूरवर तयार करतो आणि आपल्यापर्यंत पोहोचवितो आणि त्या बदल्यात आपण त्याला योग्य तेवढे पैसे मोजतो. आता हीच गोष्ट कॉम्प्युटरला लागू करा. तुमच्या कॉम्प्युटरला लागणारी मेमरी ही तशी अपुरी पडणारी गोष्ट असते आणि त्यांची पोर्टेबिलिटीसुद्धा मर्यादित असते. म्हणजे घरच्या कॉम्प्युटरमध्ये साठविलेला डेटा आपल्याला ऑफिसमध्ये पाहावयाचा असेल तर पेन ड्राइव्हसारखे हार्ड ड्राइव्ह घेऊन फिरावे लागते. शिवाय या गोष्टी बॅगेमधली जागा अडवून ठेवतात. परंतु आता तेच काम क्लाऊड तुमच्यासाठी करेल. म्हणजे तुमचा सगळा महत्त्वाचा डेटा दूर कुठे तरी स्टोअर होईल. तो इंटरनेट आणि तुमचं युजरनेम आणि पासवर्ड वापरून तुम्हाला कुठूनही मिळवता येईल. तुम्ही पाठविलेला डेटा जगभर पसरलेल्या सिक्रेट रो हाऊसमध्ये स्टोअर होतो. तुमची माहिती कुठल्या रो हाऊसमध्ये आहे हे सांगणं जरा मुश्कील असतं, कारण तो एकाच वेळी बऱ्याच ठिकाणी सेव्ह केला जातो. तुमच्या मागणीनुसार तो कुठेही मिळवता येऊ शकते.

## क्लाऊड सुविधेसाठी पैसे मोजावे लागतात का ?



प्रत्येक वेळी नाही. म्हणजे जवळजवळ सगळ्या क्लाऊड सुविधा पुरविणाऱ्या कंपन्या आपल्या युजर्ससाठी फ्री स्पेस देत असतात. त्यामुळे त्यांचे ॲप डाऊनलोड करायचे. त्यांच्या वेबसाइटवर लॉग-इन करायचे आपला लॉग-इनआयडी आणि पासवर्ड वापरून आपण कोणत्याही डिव्हाइस (काही सुविधा विशेष डिव्हाइससाठी सेवा पुरवितात) वरून आपली माहिती ॲक्सेस करू शकता. परंतु यामध्ये आपल्याला मर्यादित मेमरी उपलब्ध होते. ती वेगवेगळ्या कंपन्यांची वेगवेगळी असते. उदा. गुगल ड्राइव्ह आपल्याला १५ जीबी मोफत जागा उपलब्ध करून देतो, ड्रॉपबॉक्स आपल्याला दोन जीबी जागा उपलब्ध करून देतो आणि आपल्यामुळे एखादा मित्र ती सुविधा वापरू लागला तर आपली मेमरी लिमिट वाढविली जाते.

## कशी करायची सुरुवात ?




**आपण सर्वप्रथम ठरवायचे की कोणत्या कंपनीची क्लाऊड सुविधा आपल्याला वापरावयाची आहे. त्यानुसार आपण त्यांच्या वेबसाइटवर जाऊन लॉग-इन करायचे. आपण ॲण्ड्रॉइड वापरत असाल तर प्ले स्टोअर वरून त्या कंपनीचे ॲप डाऊनलोड करून घ्यायचे आणि आपले फोटो, व्हिडीओ, महत्त्वाच्या फाईल्स क्लाऊडवर सेव्ह करून आपण कोठूनही ॲक्सेस करू शकतो. काही महत्त्वाच्या कंपन्या आणि त्यांच्या वेबसाइट्स, तसेच त्या कंपन्या किती फ्री डेटा उपलब्ध करून देतात याबद्दल...**

- गुगल ड्राइव्ह : सर्वात लोकप्रिय आणि सर्वात उत्तम सेवा पुरविणाऱ्यांपैकी एक म्हणजे गुगल ड्राइव्ह. याच कंपनीने आताच गुगल फोटोज सुविधा अनलिमिटेड स्टोअरेज कॅपेसिटीसह उपलब्ध करून दिली आहे. परंतु गुगल ड्राइव्हवर आपण सर्व प्रकारच्या फाईल्स डेटा स्टोअर करू शकतो.
https://www.google.com/drive/ -15gb
- ड्रॉपबॉक्स : गुगल ड्राइव्हप्रमाणेच सर्व प्रसिद्ध व मुख्य म्हणजे सर्व प्रकारच्या प्लॅटफॉर्मवरून सहज ॲक्सेसकरिता येणारी सुविधा म्हणजे ड्रॉपबॉक्स
https://www.dropbox.com/ – 2gb
- मायक्रोसॉफ्ट वन ड्राइव्ह : मायक्रोसॉफ्ट हे मोठे नाव असले तरी यांच्या प्रायव्हसी पॉलिसीनुसार कंपनीला वाटल्यास ते तुमचा डेटा हवा तेव्हा मिळवू शकतात. म्हणूनही बऱ्याचदा वन ड्राइव्ह वापरणारे विचार करतात. परंतु जर आपली माहिती इतकी काही गुप्त नसेल तर मायक्रोसॉफ्ट वन ड्राइव्ह हा उत्तम पर्याय आहे.
https://onedrive.live.com/about/en-us/ -15gb
- कॉपी : वन ड्राइव्ह आणि ड्रॉपबॉक्स प्रमाणेच कॉपीदेखील सेवा पुरविते. याचे वैशिष्ट्य म्हणजे आपण एखादी फाईल एखाद्या व्यक्तीने फक्त वाचायची की त्याला ती संपादित करण्याची परवानगी द्यायची याचे नियंत्रण आपल्या हाती असते.
https://www.copy.com/page/home;section:landing -15gb
- मेगा : ही कंपनी ही क्लाऊड सेवा ग्राहकांना उपलब्ध करून देताना सुरक्षिततेचे आणि गुप्तता राखण्याचे वचन देते. आपण याचा पासवर्ड चुकून विसरलात तर आपण यावर साठविलेला डेटा कधीच परत मिळवू शकत नाही, कारण कंपनी आपल्या अकाऊंटचे पासवर्ड लॉग-इन डिटेल्स स्वतःकडे बाळगत नाही, असा कंपनीचा दावा आहे. यावर बऱ्याच लोकांनी टीका केली आहे, काहीही असले तरी सध्या मोफत सर्वाधिक स्टोरेज लिमिट मेगा आपल्याला उपलब्ध करून देत आहे.
https://mega.co.nz/ -50gb

**तर मग सुरू करा क्लाऊड कॉम्प्युटिंग आणि व्हा बदलत्या जमान्याचे साक्षीदार...**

# क्लाउड कम्प्युटिंग : इंटरनेटची दुसरी क्रांती!

**‘क्लाउड कम्प्युटिंग’ हा इंटरनेटच्या प्रगतीमधील दुसरा महत्वाचा टप्पा मानला जात आहे. दुसरी क्रांती संबोधली जात आहे. म्हणजे अजून काही वर्षांनी जगभर ‘नेट’ या शब्द-प्रयोगासोबत ‘क्लाउड’चा वापर सुरू होणार आहे. याचा उपयोग आयटी, कम्प्युटर इंजिनीअर करत आहे.**



» ‘क्लाउड कम्प्युटिंग’ काय आहे? प्रकार कोणते? : सोप्या शब्दांत सांगायचे तर इंटरनेटमार्फत आपण केवळ वेबसाईट किंवा ईमेल एवढेच न वापरता, संगणकाच्या विविध शक्ती म्हणजे ‘सॉफ्टवेअर, सर्विसेस, स्टोरेज, मेमरी आणि प्रोसेसिंग’ वापरणे म्हणजेच ‘क्लाऊड कम्प्यूटिंग’. उदा. एप्रिल २०१२ पासून गुगल कंपनीने सर्व ईमेल-धारकांना (युजर्सना)१५ गिगा-बाईटस (जीबी)चे क्लाउड-स्टोरेज उर्फ ‘गुगल ड्राइव्ह’ मोफत प्रदान केला आहे, ज्यामध्ये आपण फाईल ऑनलाइन साठवू शकतो, डॉक्यूमेंट निर्माण करू शकतो अथवा एडिट करू शकतो, प्रेजेंटेशन तयार करू शकतो, स्प्रेडशिट बनवू शकतो.

» ‘क्लाउड कम्प्युटिंग’ला वेगळं काही सॉफ्टेवअर्स लागतात का? : यासाठी तुमच्या संगणकामध्ये एमएस-ऑफिस किंवा तत्सम सॉफ्टवेअर इन्स्टॉल करण्याची गरज नाही. कारण ही कामे करत असताना, असे सॉफ्टवेअर आपण ‘गुगल क्लाऊडद्वारे’ वापरत असता.‘गुगल ड्राइव्ह’म्हणजे ‘क्लाउड कम्प्युटिंग’चा वापर करून गुगल कंपनीने ग्राहकांसाठी पुरविलेली सेवा. अशाच प्रकारची क्लाऊड स्टोरेज-सेवा मायक्रोसॉफ्ट कंपनीने ‘स्कायड्राइव्ह’मार्फत उपलब्ध करून दिली आहे. अशा सुविधा देणाऱ्या क्लाउडला ‘सॉफ्टवेअर ॲज ए सर्विस’ किंवा ‘सास’असे संबोधले जाते.

» सर्व्हर ऑनलाइन मिळतो असं म्हटलं जातं खरंय का ते? : हो, ‘क्लाउड कम्प्युटिंग’ मार्फत केवळ स्टोरेज नाही तर ‘अख्खा संगणक अथवा ‘सर्व्हर’ ऑनलाईन मिळतो. आपणास ज्या क्षमतेचा (प्रोसेसर, मेमरी, हार्ड-डिस्क) हवा असेल त्या क्षमतेचा निर्माण करता येतो. त्याची किंमत ‘पे-पर-युज’ या धोरणानुसार आकारली जाते. म्हणजे तासानुसार किंवा मासिक तत्वावर बील आकारले जाते. अशा सुविधा देणाऱ्या क्लाऊडला ‘इन्फ्रास्ट्रक्चर एज अ सर्विस’ असे संबोधले जाते.

» कोणत्या कंपन्या या सुविधा पुरवतात? : ॲमेझॉन, रेडहॅटसारख्या कंपन्या अशी सुविधा मोठ्या प्रमाणावर पुरवित आहेत. अख्ख्या संगणकासोबत आपणास हवे असणारे सॉफ्टवेअर (उदा.- ऑपरेटिंग सिस्टिम, डेटा बेस, फ्रेमवर्क, मिडल वेअर) इन्स्टाल करून मिळते. मग असे संगणक आपण नवीन सॉफ्टवेअर निर्मितीसाठी, प्रॉडक्ट निर्माण करण्यासाठी, टेस्टिंगसाठी अथवा आपल्या ग्राहकांना सेवा पुरविण्यासाठी वापरू शकतो. यासाठी मोठ्या गुंतवणुकीची गरज नाही. सर्व्हर मेंटेन करण्याचा वेगळा खर्च नाही. एसी, इलेक्ट्रिसिटी, जनरेटर किंवा यूपीएसची वेगळी गुंतवणूक करण्याची गरज नाही. अशी सुविधा देणाऱ्या क्लाउडला ‘प्लाटफॉर्म ॲज ए सर्विस’ किंवा ‘पास’ असे संबोधले जाते.

» ‘क्लाउड कम्प्युटिंग’चा वापर कुठे होतो? : हेल्थ केअर, शिक्षण, बँकिंग, प्रशासन व संस्था, मॅन्यूफॅक्चरिंग, टेलिकॉम, सेवाउद्योग, रिटेल, इन्शुरन्स इत्यादी क्षेत्रांमध्ये ‘क्लाउड कम्प्युटिंग’चा वापर होत आहे. या क्षेत्रांना क्लाउड सर्व्हिस देण्यासाठी ईएमसी, अमेझॉन, सेल्स फोर्स , व्हीएमवेअर, व्हेरीझॉन, मायक्रोसॉफ्ट, एचपी , रेड हॅट सारख्या दिग्गज कंपन्या सुसज्ज झाल्या आहेत. त्यांना ‘क्लाऊड - रेडी’ मनुष्यबळ मिळविण्यासाठी प्रयत्न करावे लागत आहेत. भारतीय युवकांना हे क्षेत्र निश्चितच प्रेरणादायी आणि उत्तम करिअरसाठी वरदान ठरेल.

**क्लाऊड कम्प्युटिंगचा उपयोग तसा १९६० पासून होत होता.‘मेनफ्रेम’ संगणकाचा वापर करून तो केला जायचा, पण तो प्रचलित नव्हता. प्राध्यापक डॉ. रामनाथ चेल्लप्पा यांनी १९९७ मध्ये ‘क्लाऊड कम्प्युटिंग’ची सर्व प्रथम व्याख्या अमेरिकेतील डॅलस येथे व्याख्यानामध्ये केली. १५ नोव्हेंबर २००७ रोजी न्यूयॉर्क टाईम्सने ‘आयबीएम क्लाऊड कम्प्युटिंगला विकसित करणार’ या शीर्षकाचा अहवाल प्रकाशित केला आणि मग आयटी क्षेत्रातील दिग्गज कंपन्यांनी ‘क्लाऊड कम्प्युटिंग’ मध्ये आपली उत्पादने, सेवा, ॲप्लिकेशन्स निर्माण करावयास सुरुवात केली.**

## शॉर्ट न्यूज

### ९ फेब्रुवारीला रंगणार रनर्सचा महाकुंभ

**नगर :** महाराष्ट्रातील नावाजलेली व अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्वात मोठी मानाची हाफ मॅरेथॉन म्हणून ओळख असलेली नगर रायझिंग मॅरेथॉन यंदा रविवारी (ता. ९) आयोजित करण्यात आली आहे. या मॅरेथॉनचे आयोजन नगर रायझिंग फाउंडेशनने केले आहे. या स्पर्धेसाठी दोन हजारपेक्षा जास्त धावपटूंनी सहभाग नोंदविला आहे. यंदाचे हे नववे वर्ष आहे. टाईमपास फेम प्रथमेश परब सह प्रसिद्ध मराठी अभिनेते व अभिनेत्री या स्पर्धेत आकर्षणाचा केंद्र ठरणार आहेत, अशी माहिती नगर रायझिंग फाउंडेशनचे अध्यक्ष उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांनी दिली.

### पोलिसांनी ७५ गायींना दिले जीवदान

**कोपरगाव :** गोवंश जनावरांची कत्तल करणे कायद्याने गुन्हा असला तरी कोपरगाव शहरातील संजयनगर, आयशा कॉलनी, हाजी मंगल कार्यालय परिसरात तोच गुन्हा पुन्हा पुन्हा होतोय. बेकायदा कत्तलखाने चालवून गोवंश जनावरांची बेसुमार कत्तल केल्याच्या घटना अनेकवेळा उघड झाल्या. अशाही परिस्थितीत कोपरगाव शहर व तालुका पोलिसांनी चमकदार कामगिरी करीत गेल्या एक वर्षात खाटकांच्या तावडीतून तब्बल ७५ गोवंश जनावरांची सुटका करून जीवदान दिले आहे.

### नेवाशात क्रीडा संकुलाचे काम सुरू करा

**नेवासा :** तालुक्यात बऱ्याच दिवसांपासून रेंगाळलेले क्रीडा संकुलाचे काम सुरू करावे, अशी मागणी मराठा समाज सेवा संस्थेने केली आहे. याबाबत आमदार विठ्ठलराव लंघे यांची भेट घेऊन त्यांच्याकडे ही मागणी करण्यात आली. नेवासा खुर्द येथील क्रीडा संकुलाची जागा योग्य नसल्याचा अभिप्राय खेळाडू व क्रीडाप्रेमीं मार्फत प्राप्त झाल्याने नवीन जागेची मागणी नेवासा तहसीलदारांना पाठविलेल्या पत्रात करण्यात आली आहे. नेवासा येथे क्रीडा संकुल व्हावे अशी अनेक दिवसांपासून क्रीडाप्रेमींची इच्छा आहे.

### अपर तहसील कार्यालय अध्यादेशाची होळी

**संगमनेर :** तालुक्यात नव्याने होऊ घातलेल्या आश्वी बु. येथील अपर तहसील कार्यालयास तालुक्यातील खांडगाव, अंभोरे, जाखुरी, कोळवाडे, निमज, पिंपरणे, खराडी या गावांनी विशेष ग्रामसभा बोलवून विरोध दर्शवला आहे. संगमनेर तालुक्याचे होणारे विभाजन हे तालुक्यातील जनतेला मान्य नसून, अनेक गावे आता आक्रमक झाली आहेत. दरम्यान, पिंपरणे येथे या नवीन अध्यादेशाची नागरिकांनी होळी करीत संताप व्यक्त केला.

### परिक्रमा महोत्सवात डीजे वाजविण्यास बंदी

**शिर्डी :** यावर्षी १३ फेब्रुवारी २०२५ रोजी होणाऱ्या श्री साईबाबा शिर्डी परिक्रमा महोत्सवात साईभक्तांना कोणतीही असुविधा होऊ नये, यासाठी शासकीय विभागांनी समन्वय साधावा आणि महोत्सव यशस्वी करण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशा सूचना अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर यांनी दिल्या. यंदाच्या परिक्रमा महोत्सवात (डीजे) बंदी असणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. ग्रीन अँण्ड क्लिन शिर्डी फाऊंडेशन, विविध सामाजिक संघटनांच्यावतीने आयोजित केल्या जाणाऱ्या परिक्रमा तयारीचा आढावा अपर जिल्हाधिकारी कोळेकर यांनी घेतला.

# जयहिंद पॉलिटेक्निकच्या विद्यार्थीनींचे विभागीय स्पर्धेत यश

## कबड्डी स्पर्धेत राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड



**नारायणगांव : प्रतिनिधी**

**समर्थ कॉलेज ऑफ फार्मसी येथे नुकत्याच इंटर इंजिनिअरींग डिप्लोमा स्टुडन्ट्स स्पोर्टस असोशिएशनच्या वतीने घेण्यात येणाऱ्या डी-१ झोन अंतर्गत मुलींच्या कबड्डी स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेमध्ये जयहिंद पॉलिटेकिनिक कुरण या संघाने अंतिम सामन्यात शासकिय तंत्रनिकेतन अवसरीच्या संघावर १३ गुणांनी विजय मिळवला व राज्यस्तरीय स्पर्धेत प्रवेश मिळवला.**

या स्पर्धेत पुणे व पिंपरी चिंचवड परिसरातील १० संघानी सहभाग नोंदवला होता. यामध्ये अंतिम सामना जयहिंद पॉलिटेक्निक, कुरण व शासकिय तंत्रनिकेतन अवसरी यांच्यात झाला. यामध्ये जयहिंद पॉलिटेक्निकच्या संघाने विजय मिळवला. विजयी संघाला प्रा. मेघा कोकणे व प्रा. किरण कानडे यांनी मार्गदर्शन केले.

या विजयाबद्दल जयहिंद शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष जितेंद्र गुंजाळ, सचिव विजय गुंजाळ, संचालिका डॉ. शुभांगी गुंजाळ, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. दतात्रय गल्हे, प्राचार्य डॉ. स्वप्निल पोखरकर यांनी अभिनंदन केले व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# वृद्धेश्वराच्या दर्शनाने सर्व तीर्थक्षेत्रांचे एकत्रित पुण्य मिळते

## भागवत महाराज उंबरेकर यांचे प्रतिपादन

**पाथर्डी : प्रतिनिधी**

**श्रीक्षेत्र वृद्धेश्वर पृथ्वी तलावरील साक्षात स्वर्ग आहे. सर्व प्रकारची तीर्थक्षेत्रे एकत्रित करून जेवढे पुण्य प्राप्त होते. तेवढे वृद्धेश्वराच्या एका दर्शनाने प्राप्त होते. स्वयंभू स्वरुपात पिंडीवरील प्रवाहित असलेली गंगा कुंभ पर्वासाठी महत्त्वाची आहे. या तीर्थाचे अल्पसे जल अंगावर शिंपडल्यास कुंभ स्नानाचे फळ मिळते. अशा ठिकाणी साक्षात शिवपार्वतीचा अखंड वास आहे, असे प्रतिपादन वारकरी सांप्रदायातील भागवत महाराज उंबरेकर यांनी केले.**



श्रीक्षेत्र वृद्धेश्वर येथे सोमवारी कालभैरव, माता जोगेश्वरी व उजव्या सोंडेचा स्वयंभू गणेश या मूर्तींची पुर्नस्थापना कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी विविध संत महंत ब्रह्मवृंद पुजारी, ग्रामस्थ उपस्थित होते.

उंबरेकर महाराज म्हणाले, शिवपुराण, नवनाथ भक्तिसार, काशी महात्म्य आशा विविध शिवग्रंथांत व नाथ साहित्यात वृद्धेश्वराचा उल्लेख वेगवेगळ्या स्वरुपात आढळतो. कलियुगात शिव उपासना कल्याणकारी समजली जाते. कर्मकांडापेक्षा श्रद्धायुक्त अंतकरणाने केलेले शिवपूजन सर्वश्रेष्ठ ठरते. वृद्धेश्वराचे स्वयंभू शिवलिंग आहे.

सध्या सुरू असलेल्या कुंभमेळा पर्वणी स्नानासाठी कोट्यवधी भाविक तेथे पोहोचत आहेत. ते क्षेत्र अद्वितीय आहेच. पण त्याच्याच तोडीचे श्रीक्षेत्र वृद्धेश्वर आहे. स्वयंभू शिव पिंडीच्या लिंगातून अखंड वाहणारी गंगा हीच त्रिवेणी संगमातही प्रवाहित आहे. येथील गंगे समान असलेल्या पवित्र जलाचे दोन चार थेंब अंगावर शिंपडून घेतले, तरी आपल्याला कुंभ स्नानाचे पुण्य मिळते. एवढे महात्म या भूमीचे आहे. नाथ संप्रदायाची मुहूर्तमेढ येथे रोवली गेली. येथूनच नाथ संप्रदाय जगभर प्रसारित झाला.

देवस्थान समितीच्या पुढाकाराने मूर्ती स्थापना कार्यक्रमाचे आयोजन यशस्वी करण्यात भाविकांसह पाथर्डीचे उद्योजक रवींद्र पाथरकर व कुटुंबीयांचे विशेष सहकार्य लाभले. देवस्थान समितीने या परिसरातील प्राचीन परंपरा व संप्रदायाच्या पाऊल खुणाचे जतन करून भाविकांना सांप्रदायाचा उलगडा होईल अशा पद्धतीने नियोजन करावे कथा व चित्र स्वरूपात मंदिराच्या परिसरात माहितीपत्रके लावल्यास भाविकांना संप्रदाय व स्थान महात्म्य अधिक सहजपणे कळू शकेल, असे ते म्हणाले. यावेळी महंत शंकर महाराज ससे, कल्याण महाराज शिंदे, वृद्धेश्वर देवस्थानचे अध्यक्ष गणेश पालवे,पत्रकार अविनाश मंत्री,सुरेशदेवा मुळे, संजुदेवा जोशी, रामनाथ जाधव आदी उपस्थित होते.

# महामार्गालगतची अतिक्रमणे त्वरित काढा

## जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांचे निर्देश

**नगर : प्रतिनिधी**

**सुरक्षित वाहतुकीसाठी फेब्रुवारी अखेरपर्यंत जिल्ह्यातील महामार्गालगतची अतिक्रमणे त्वरित काढण्यात यावी आणि रस्त्याच्या बाजूला असलेले धोकादायक फलकही काढण्यात यावे, असे निर्देश जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ रस्ता सुरक्षा समितीच्या बैठकीत दिले.**

बैठकीस सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता भरतकुमार बाविस्कर, उपजिल्हाधिकारी अतुल चोरमारे आणि विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



जिल्हाधिकारी म्हणाले, रस्त्याच्या कडेला असणारी अतिक्रमणे काढण्यासाठी उपविभागीय अधिकारी समन्वयक अधिकारी म्हणून काम पाहतील. तोडलेल्या रस्ता दुभाजकांची दुरूस्ती करण्यात यावी. दुभाजक तोडणाऱ्या संबंधित पेट्रोल पंप चालक अथवा आस्थापना मालकावर कारवाई करावी. वाहतूक सुरक्षेबाबत सर्वेक्षण करण्यासाठी संस्थेची नियुक्ती करण्यात यावी. नेवासे आणि इमामपूर येथील अपघातप्रवण भागात आवश्यक उपाययोजना कराव्यात, असे निर्देश त्यांनी दिले आहेत.

# मंदिर परिसरांच्या विकासाला निधीची कमतरता भासू देणार नाही - पालकमंत्री

**राहाता : प्रतिनिधी**

**पुरातन मंदिरे ही हिंदू धर्म आणि संस्कृतीची प्रतिके आहेत. विकासाची प्रक्रिया राबविताना आध्यात्मिक वारसा जोपासणे हे आपले कर्तव्य असून मंदिर परिसरांच्या विकासाला निधीची कमतरता भासू देणार नाही, अशी ग्वाही पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.**

राहाता शहराचे आराध्यदैवत श्री वीरभद्र महाराज मंदिराला 'क' वर्ग देवस्थानाचा दर्जा प्राप्त करून दिल्याबद्दल पालकमंत्री विखे पाटील यांचा विश्वस्त मंडळाच्यावतीने सत्कार करण्यात आला. तसेच वीरभद्र महादेव मंदिराच्या जीर्णोद्धार कार्यक्रमाच्या कोनशिलेचे अनावरण करण्यात आले.याप्रसंगी माजी मंत्री आण्णासाहेब म्हस्के पाटील, मुकुंदराव सदाफळ, देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष साहेबराव निधाणे, अॅड.रघुनाथ बोठे, उपाध्यक्ष सचिन बोठे, माजी नगराध्यक्ष कैलास सदाफळ आदी उपस्थित होते.



पालकमंत्री विखे पाटील म्हणाले की, जिल्ह्यातील तीर्थक्षेत्र पर्यटनाला पाठबळ देण्याचे काम जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून करण्यात येत आहे. विकासाची प्रक्रिया पुढे घेवून जाताना पारंपरिक मंदिरांचा वारसाही जोपासणे आपले कर्तव्य आहे.

**वाचकांच्या लेखणीतून**

# फुलवर

इंदिरा गांधी भारताच्या पंतप्रधान असताना त्यांनी कॉंग्रेस पक्षाच्या माध्यमातून गरिबी हटावची घोषणा दिली होती. जनतेच्या ती अजूनही स्मरणात आहे.

डॉ. राममनोहर लोहिया, तत्कालीन समाजवादी पक्षाचे महान नेते आणि विचारवंत होते. हिंदी हीच भारताची राष्ट्रभाषा व्हावी, असे त्यांचे मत होते. पण इंग्रजीचे फाजील महत्त्व कमी करण्यासाठी त्यांनीही अंगरेजी हटावचा नारा दिला होता. अंगरेजी हटाव हा त्यांच्या व्यापक भाषिक नीतीचाच एक भाग होता.

काही वेळेला इंग्रजी शब्दाला समानार्थी हिंदी शब्द उपलब्ध होत नसेल, तर ही समस्या सामान्य जनताच सोडवील, असे डॉ. लोहियांचे मत होते. उदाहरणार्थ प्लॅटफॉर्म या इंग्रजी शब्दाला हिंदी भाषी सामान्य जनतेने लाटफारम असा हिंदी समानार्थी शब्द दिला होता.

आपल्या ग्रामीण भागात हल्ली फ्लॉवरचे पीक घेतले जाते. फ्लॉवर ही भाजी परदेशातून आपल्याकडे आलेली आहे. तिच्या नावावरूनच याचा बोध होईल. आपल्या ग्रामीण भागात फ्लॉवरला फुलवर असे म्हणतात. किती सुंदर आहे हा शब्द! फुलवरची भाजी करतात. ती चविष्ट लागते.



फुलवरची भाजी करताना एक काळजी मात्र घेतली पाहिजे. ही जीवनावश्यक माहिती मला एका शेतकऱ्यापासून मिळाली. फुलवरच्या भाजीच्या गड्ड्याच्या मुळाजवळ कधी कधी सापाची मादी अंडी घालून पिल्लेही काढते. परिणामी फुलवरच्या गड्ड्यांच्या फटींमध्ये ही पिल्ले आश्रय घेत असतात. लोक त्यांना अळ्या समजतात. पण त्यात धोका असतो. शिवाय सापाचा स्पर्श झाल्याने फुलवरच्या गड्ड्याला एक प्रकारच्या लाल रंगाची झाक प्राप्त होते. अशा फुलवरची भाजी खाणे आरोग्याला धोकादायक असते. एवढी खबरदारी मात्र आपण घेतली पाहिजे.

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
निघोज, ता. पारनेर,
जि. अहमदनगर.

# एक कोटी ११ लाखांची फसवणूक करणारे जेरबंद

## सायबर पोलिसांची कारवाई | आरोपींना पोलिस कोठडी

**नगर : प्रतिनिधी**

**शेअर ट्रेडिंगमध्ये पैसे गुंतवणूक केल्यास २० ते ३० टक्के अधिक नफा मिळून देतो, असे म्हणत एक कोटी १० लाख ८० हजारांची फसवणूक करणाऱ्यांना सायबर पोलिसांनी सोलापूर येथून ताब्यात घेतले आहे. त्यांना न्यायालयात हजर केले असता पोलीस कोठडी सुनावली आहे.**



महावीर दिगंबर कांबळे (रा. गोटेवाडी ता. मोहोळ जि. सोलापूर), प्रवीण दत्तू लोंढे (वय ३८ रा. वडवळ स्टॉप, कोळेगाव ता. मोहोळ जि. सोलापूर), शिवाजी साहेबराव साळुंके (वय ४० रा. वडवळ ता. मोहोळ), सागर शंतजय कुलकर्णी (रा. वाणी गल्ली, ता. मोहोळ ता. जि. सोलापूर) यांना ताब्यात घेतले आहे. एसएमसी ग्लोबल सिक्युरिटीज व्हॉटसअप मोबाईल नंबरहून तक्रारदार यांना शेअर ट्रेडिंग मध्ये पैसे गुंतवून २० ते ३० टक्के अधिक नफा मिळवून देतो, असे सांगण्यात आले. यावर त्यांचा विश्वास बसला. त्यानंतर आरोपींनी एक कोटी दहा लाख ८० हजार रुपयांची फसवणूक केली. याबाबत सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

यानंतर सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मोरेश्वर पेंदाम यांना मिळालेल्या माहितीनुसार तसेच तांत्रिक विश्लेषणानुसार हा गुन्हा सोलापूर येथील महावीर कांबळे याने त्याच्या साथीदारांसह केला असल्याचे समजले. त्यानुसार पथकाने सापळा रचून आरोपीला ताब्यात घेतले. ही कारवाई सायबर पोलीस ठाण्याचे पोसई योगेश चाहेर, पोलीस अंमलदार योगेश गोसावी, अभिजीत अरकल, राहुल हुसळे, निलकंठ कारखेले, अरुण सांगळे, मोहम्मंद शेख, मल्लिकाअर्जुन बनकर, दिगंबर कारखेले, दिपाली घोडके, सविता खताळ, प्रितम गायकवाड यांच्या पथकाने केली.

याबाबत शेअर्स मार्केट मध्ये गुंतवणूक करून मोठ्या परताव्याचे आमिष दाखवत फसवणुकीचे गुन्हे मोठ्या प्रमाणात घडत आहेत. फसवणूक करणारी टोळी परदेशातील असून येथील स्थानिक गुन्हेगारांच्या मदतीने गरिबांना पैशाची आमिष देऊन त्यांच्याकडुन फसवणुकी करिता करंट अकांऊट ओपन करून त्यामध्ये ऑनलाईन बँकिग चालू करून ऑनलाईन बँकेचा ॲक्सेस परदेशात दिला जातो. त्यामुळे परदेशात असलेले मुख्य सूत्रधारांना अटक करण्यात अडचणी निर्माण होतात. तरी सायबर पोलीस पोलिसांमार्फत नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की, आपण मोठ्या रकमेच्या परताव्याच्या आमिषाला बळी न पडता खात्री करून योग्य त्या ठिकाणी गुंतवणूक करावी. तसेच आपल्या नावावर आपल्या कागदपत्राचा वापर करून कोणी अकाऊंट ओपन करीत असेल अगर सिमकार्ड खरेदी करत असेल त्यापासून सावध राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# (पान १ वरून) संत तुकारामांचे वंशज शिरीष महाराजांची आत्महत्या

अंदाज व्यक्त केला आहे. अधिक तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक विक्रम बनसोडे करत आहेत. त्यांच्या पश्चात आई आणि वडील आहेत. ''ज्याच्या कपाळावर टिळा नाही, त्यांच्याकडून खरेदी करणे टाळा,'' असे आवाहन शिरीष महाराज हे हिंदूंना करत. ते प्रसिद्ध हिंदू धर्मप्रचारक संभाजी भिडे यांच्या विचारांचे अनुयायी होते. ते वारकरी संप्रदायात सक्रिय होते आणि संत तुकाराम महाराजांच्या विचारांचा प्रसार करत होते. त्यांचे निगडी येथे इडली उपहारगृह देखील होते.

हिंदूंवर होणाऱ्या अन्याय अत्याचारावर ते कायम भाष्य करत असतं. 'लव्ह जिहाद', 'उद्योग जिहाद', 'लॅण्ड जिहाद', 'फूड जिहाद', धर्मांतरणासारख्या प्रकरणावरही त्यांचे भाष्य गाजले.प्रसिध्द व्याख्याते, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक आणि शिवशंभो प्रतिष्ठानचे अध्यक्ष असलेल्या शिरीष महाराज यांच्या आत्महत्येमुळे परिसरात आणि वारकरी संप्रदायात मोठी खळबळ उडाली आहे.त्यांच्या पार्थिवावर वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या आकस्मिक निधनामुळे देहू आणि वारकरी संप्रदायात हळहळ व्यक्त केली जात आहे.

### कोणीही असो प्रत्येकावर कारवाई होणारचं !

कारवाई होणार, असे जाहीरपणे सांगितले.

''संतोष देशमुख यांच्या हत्येसारख्या घटना कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतल्या जाणार नाहीत. कोणीही असो प्रत्येकावर कारवाई होईल हा विश्वास मी तुम्हाला देतो. माझी बीडच्या जनतेला विनंती आहे की आपण छत्रपती शिवाजी महाराजांचे मावळे आहोत. छत्रपती शिवाजी महाराजांनी १८ पगड जातींनी एकत्र करुन स्वराज्याचा स्थापना केली. आपल्यालाही अशाच प्रकारे सर्वांना एकत्र नांदायचे आहे आणि एक नवीन बीड आपण तयार करू, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

बीडचा जो इतिहास सुरेश धस किंवा पंकजा मुंडेंनी सांगितला इतकी मोठी लोक आपल्याला बीडने दिली आहेत. तोच इतिहास पुढे जाईल आणि एक गौरवशाली बीडचा इतिहास तयार करण्यासाठी आपल्या सर्वांचे जे प्रयत्न आहेत, त्या प्रयत्नांच्या पाठीशी मी देखील ठामपणे उभा राहिन, इतकंच या निमित्ताने सांगतो, असेही देवेंद्र फडणवीस म्हणाले.

# डॉक्टर प्रीमियर लीगमध्ये डॉन इलेव्हन विजेता

## पार्थ इलेव्हनला उपविजेतेपद

**अहिल्यानगर : प्रतिनिधी**

**पारनेर तालुका मेडिकल प्रॅक्टीशनर असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या डॉक्टर्स प्रीमिअर लीग या डॉक्टरांच्या जिल्हा स्तरीय क्रिकेट स्पर्धेमध्ये अहिल्यानगर येथील डॉन इलेव्हन या संघाने विजेतेपद पटकाविले. पाथर्डीच्या पार्थ इलेव्हनला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.**

या स्पर्धेत जिल्ह्यातील एकूण आठ संघांनी सहभाग नोंदविला. ३१ जानेवारी ते २ फेब्रुवारी दरम्यान नगरच्या वाकोडी फाटा येथील साईदिप क्रिकेट अॅकडमी येथे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

राहुरीच्या राहुरी इलेव्हन तिसऱ्या क्रमांकावर तर पारनेर टायगर्स संघ चौथ्या स्थानावर राहीला. विजेत्या संघास ३१ हजार, उपविजेत्या संघास २१ हजार तिसऱ्या स्थानावरील संघास १५ हजार तर चौथ्या क्रमांकावरील संघास ११ हजार रूपायांचे बक्षिस तसेच करंडक देण्यात आले.यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बापूसाहेब नागरगोजे, पत्रकार प्रकाश पाटील, डॉ. पी.बी.कर्डिले, डॉ. सतीश सोनवणे, डॉ. राहुल पंडीत यांच्या हस्ते बक्षिस वितरण करण्यात आले. स्पर्धा सुरू होण्यापूव डॉ.गोपाल बहुरूपी यांनी अनोख्या अंदाजामध्ये पीच रिपोर्ट सादर केला.

स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी डॉ. भाऊसाहेब खीलारी, डॉ. सोमेश्वर आढाव, डॉ. संदीप तांबे, डॉ. संदीप औटी, डॉ. पांडूरंग थोरात, डॉ. नितीन रांधवन, डॉ. अजित लंके, डॉ. सुनील कदम, डॉ. प्रदिप दाते, डॉ. बाळासाहेब पठारे, डॉ. किरण रोहोकले, डॉ. विजय पुरी, डॉ. संजय बांडे, डॉ. अजय येणारे, डॉ. मंगेश वाळुंज, डॉ. मनीष खरमाळे, डॉ. गणेश सांगळे, डॉ. अतुल बांडे, डॉ. राजेंद्र वाकळे यांचे सहकार्य लाभले.



■ पारनेर तालुका मेडिकल प्रॅक्टीशनर असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या डॉक्टर्स प्रीमिअर लीगमध्ये डॉन इलेव्हनने विजेतेपद पटकाविले.

### सद्भावना दृढ होईल

आजच्या धकाधकीच्या जीवनात डॉक्टरांनी एकत्र राहून खेळ खेळल्यास तंदुरूस्ती राहीलच परंतू स्पर्धेच्या युगामध्ये एकमेकांबददलची सद्भावना दृढ होईल. पारनेर तालुका मेडिकल प्रॅक्टीशनर असोसिएशनचा हा उपक्रम स्तुत्य आहे. विजेत्या संघांचे अभिनंदन.

**प्रकाश पाटील,**
ज्येष्ठ पत्रकार

### क्रीडा संकुलासाठी सर्वतोपरी मदत

संघटनेच्या माध्यमातून अशा प्रकारचे क्रीडा संकुल प्रत्येक तालुक्यात असणे, त्या डॉक्टरांनी नियमितपणे खेळ खेळणे हे महत्वाचे असल्याचे डॉ. पी.बी. कर्डिले यांनी सांगितले. तोच धाग पकडून डॉ. सतिश सोनवणे यांनी क्रिडा संकुलासाठी सर्वतोपरी मदत करण्याची ग्वाही दिली.

# ३०९ शाळेतील सुविधांची न्यायाधीशांकडून तपासणी

## भौतिक सुविधांचा अहवाल उच्च न्यायालयाला सादर होणार

**पारनेर : प्रतिनिधी**

**जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना भौतिक सुविधा मिळतात का नाही याची पाहणी करण्यासाठी उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पारनेर न्यायालयाच्या त्रिसमितीय न्यायाधीशांकडून तालुक्यातील ३०९ प्राथमिक शाळांची तपासणी सुरू आहे.**

याबाबत अधिक माहीती अशी की,शाळेची इमारत,क्रीडा सुविधा,प्रयोगशाळा,ग्रंथालय, वैद्यकीय कक्ष,स्वच्छता सुविधा आणि संगणक प्रयोगशाळा यासारख्या सुविधा असल्याने विद्यार्थ्यांचा मानसीक विकास होतो.त्यामुळे या प्राथमिक शाळांतील बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा कायदा नुसार व उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार तपासणी केली जात आहे.(ता.२२) जानेवारीपासून या त्रिसमितीय न्यायाधीश समितीकडून या भौतिक सुविधांची तपासणी केली आहे.या संबंधीचा अहवाल उच्च न्यायालयाला सादर केला जाणार असल्याची माहिती समजली आहे.

तालुक्यात एकुण ३२७ जिल्हा प्राथमिक शाळा आहेत यापैकी १८ शाळांची या अगोदर जिल्हा न्यायाधीशांकडून भौतिक सोयी सुविधा संदर्भात तपासणी करण्यात आलेली आहे. उर्वरित ३०९ प्राथमिक शाळांची या त्रिसमितीय न्यायाधीश समिती कडून केंद्रनिहाय तपासणी केली जात आहे.




### या बाबींची होणार तपासणी

प्राथमिक शाळेतील वर्गखोल्या, प्रयोगशाळा,ग्रंथालय,संगणक कक्ष,स्वच्छतागृहे,प्रसाधनगृहे,खेळाचे मैदान, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था,विद्युत सुविधा, वैद्यकीय कक्ष यांची पाहणी व तपासणी केली जाणार आहे.

# पाडळी रांजणगाव येथे २६ घरकुलांना मंजुरी

## सरपंच विक्रमसिंह कळमकर यांची माहिती

**पाडळी रांजणगाव : प्रतिनिधी**

**पाडळी रांजणगाव ग्रामपंचायतीच्या माध्यमातून प्रधानमंत्री आवास योजनेतुन पाडळी रांजणगाव व कळमकरवाडी येथे २६ घरकुलांना मंजुरी मिळाली असल्याचे पाडळी रांजणगावचे सरपंच विक्रमसिंह कळमकर यांनी सांगितले.**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या सर्वांसाठी घरे या संकल्पनेनुसार प्रधानमंत्री घरकुल आवास योजना ही गरिबांसाठी असणारी कल्याणकारी योजना केंद्र व राज्य सरकार राबवित आहे. सन २०१६/१७ पासून ग्रामपंचायत च्या माध्यमातून गरजू लाभार्थी यांच्या प्रतीक्षा यादी ड ' या यापूर्वीच तयार करण्यात आलेल्या आहेत.

पारनेर तालुक्यात विक्रमी चार हजार घरकुलांना मंजुरी मिळाली असून त्याचाच भाग म्हणून पाडळी रांजणगाव येथील प्रतीक्षेत असणाऱ्या सर्व लाभार्थ्यांना लाभ मिळाला आहे.यासाठी आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची पूर्तता, जागा आदींबाबत ग्रामपंचायतीच्या माध्यमातून पाठपुरावा करण्यात आलेला आहे.



पाडळी रांजणगाव ग्रामपंचायत गेल्या पाच वर्षात मोठया प्रमाणात रमाई आवास, शबरी आवास या घरकुल योजना राबवून सर्व घटकातील नागरिकांना लाभ देण्याचा प्रयत्न केलेला आहे. आता प्रधानमंत्री आवास योजनेतून खुल्या वर्गातील गरिबांना घरकुल योजनेचा लाभ मिळवून देण्यात यशस्वी झाल्याचे समाधान असून सर्व लाभार्थी यांनी तात्काळ ग्रामपंचायतीच्या सूचनेनुसार काम सुरु करावे असे सरपंच विक्रमसिंह कळमकर,सोसायटी चेअरमन डी. बी. करंजुले, उपसरपंच संगम साठे, ग्रामपंचायत अधिकारी एस. एन. थोरात यांनी सांगितले.

# कॅरम स्पर्धेत 'एसपीआयटी'ला विजेतेपद

## राज्य पातळीवरील स्पर्धेसाठी निवड



**कुरूंद : प्रतिनिधी**

**मंगळवार दि.४ फेब्रुवारी रोजी नेप्ती येथील छत्रपती शिवाजी महाराज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथे संपन्न झालेल्या आंतर पदविका विभागीय आयडीएसएसए क्रीडा स्पर्धेत कुरूंद येथील एसपीआयटी पॉलिटेक्निक या संघाने कॅरमच्या अंतिम सामन्यात कोपरगांवच्या संजीवनी पॉलीटेक्निकचा पराभव करत विजेतेपद पटकाविले. कुरूंद कॉलेजचा विजयी संघ आता नांदेड येथे होणाऱ्या राज्य पातळीवरील स्पर्धेत सहभागी होणार आहे.**

या खेळाडूंना संघ व्यवस्थापक प्रा. किशोरकुमार कोकणे, प्रा. नितीन शेळके क्रीडा विभाग प्रमुख प्रा. विक्रांत मल्लाव यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. विजयी खेळाडून आदित्य मनोज जाधव आणि चैतन्य शहाजी पवार यांनी विजय संपादन केल्याबद्दल संजीवनी प्रतिष्ठान मुंबईच्या खजिनदार व महानगर बँकेच्या अध्यक्षा सुमनताई शेळके, सचिव सर्फराज पठाण, महानगर व जिल्हा बँकेच्या संचालिका गीतांजली शेळके, स्मिता शेळके, प्राचार्य सुनीलदत्त कापसे, सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व पालकांनी अभिनंदन केले.

# शिक्षणाबरोबरच व्यवहार ज्ञान आत्मसात करा

## वसंत कवाद यांचे आवाहन

**निघोज : प्रतिनिधी**

**जीवनात यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी पुस्तकी ज्ञानाबरोबच व्यवहारिक ज्ञानही आत्मसात केले पाहिजे असे आवाहन बाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष वसंत कवाद यांनी केले.**

न्यू इंग्लिश मिडियम स्कुल येथे आयेजित करण्यात आलेल्या बाल आनंद मेळाव्याचे उद्घाटन कवाद यांच्या हस्ते करण्यात आले.त्यावेळी ते बोलत होते. मा. सरपंच चंद्रकांत लामखडे हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी ठकाराम लंके, अमृताशेठ रसाळ, शांताराम कळसकर, प्रकाश कवाद, नामदेवराव थोरात, रामदास वरखडे, सुनील वराळ, रामदासशेठ वरखडे, दत्तात्रय लंके, शांताराम सुरकूंडे, सुनील तांबे, आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी शालेय शिक्षणाबरोबरच व्यवहार ज्ञानाचे धडे गिरवत पुढील आयुष्यात ज्ञानाचा उपयोग करावा व जीवनात प्रचंड प्रगती करावी असे आवाहन कवाद यांनी केले.




### सिध्दार्थ, विहान, सायाची कमाई !

आपले कौशल्य पणाला लाउन मोठया गटात सिध्दार्थ राहुल रसाळ व विहान ठकाराम लंके यांनी तिन हजार तर छोटया गटामध्ये साया अमोल ढुबे हिनेदोन हजार रूपयांची विक्रमी कमाई केली. जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर शुन्यातून विश्व निर्माण करण्याची ताकद विद्यार्थ्यांनी या मेळाव्यातून दाखवून दिली.

या मेळाव्यात इयत्ता तिसरी ते नववी पर्यंतच्या ३५० विद्यार्थ्यांनी भाग घेतला. खाऊ गल्ली तसेच भाजीपाला, विविध फळांच्या विक्रीतून विद्यार्थ्यांनी आपले कौशल्य पणाला लावले. विविध खेळांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी सांघिक एकीचे दर्शन घडविले. मेळाव्यात दिड लाख रूपयांची उलाढाल झाली.

विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी शाळेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव शाळेचे सर्व विश्वस्त, निघोज व परिसरातील विविध क्षेत्रात कार्यरत असणारे सर्व पदाधिकारी, शाळेचे प्राचार्य, व्यवस्थापन समिती को ऑर्डिनेटर, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्ग यांनी परीश्रम घेतले.

# लहान मुलांचे आरोग्य शिबीर घेणे ही काळाची गरज

## डॉ.स्वाती पानगे यांचे प्रतिपादन | राळेगण थेरपाळला आरोग्य शिबिर



**राळेगण थेरपाळ : प्रतिनिधी**

**लहान मुलांचे आरोग्य शिबीर घेणे ही काळाची गरज असून सरपंच पंकज कारखिले व त्यांच्या सहकाऱ्यांचे समाजसेवी उपक्रम अतिशय स्तुत्य असल्याचे प्रतिपादन डॉ. स्वाती पानगे यांनी व्यक्त केले आहे.**

राळेगण थेरपाळ येथील जिल्हा परिषद शाळेत, पुणे येथील रुबी हॉल क्लिनिक, आरोग्य केंद्र, ग्रामस्थ व ग्रामपंचायत माध्यमातून आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी त्या बोलत होत्या. राळेगण थेरपाळचे लोकनियुक्त सरपंच पंकज कारखिले या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

यावेळी कोहकडीच्या उपसरपंच सुनिता जांभळकर, पारनेर तालुका ग्रामीण पत्रकार महासंघाचे अध्यक्ष जयदीप कारखिले, नरेश सोनवणे, मंगेश कार्ले, भाऊ सरोदे, शशिकांत कारखिले, बाळा कार्ले, विशाल सोनवणे, हनुमंत कारखिले, चेअरमन दत्तात्रय कारखिले, जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक तसेच अंगणवाडी सेविका, आशा सेविका, विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या विद्यार्थी आरोग्य शिबीरात २७० रुग्णांनी शिबीराचा फायदा झाला. २३० विद्यार्थ्यांचे डोळे तपासण्यात आले. तसेच सर्व विद्यार्थ्यांचे हिमोग्लोबिन तपासणी करीत त्यावरील आहार तसेच औषध व उपचार याची सविस्तर माहिती देण्यात आली. अनेक विद्यार्थ्यांना चष्मा वाटप करण्यात आले.

डॉ. पानगे यावेळी म्हणाल्या आई वडील यांनी मुलांच्या आरोग्याची काळजी घेताना प्राथमिक आरोग्य केंद्रात नियमित तपासणी करणे आवश्यक आहे. मोबाईलचा वापर विद्यार्थ्यांनी टाळणे गरजेचे आहे यासाठी पालकांनी काळजी घेणे गरजेचे आहे. लहान मुलांना योग्य तो आहार देण्याची गरज असून यासाठी पालकांनी दक्ष राहणे आवश्यक आहे.

सरपंच पंकज कारखिले यावेळी म्हणाले माजी खासदार डॉ.सुजय विखे पाटील यांच्या प्रयत्नमुळे जिल्हा परिषद शाळेचा समावेश पी एम श्री योजनेत झाला. या योजनेमुळे शाळेतील भौतिक सुविधा वाढणार आहेत. यामध्ये क्रीडा शिक्षक, विद्यार्थ्यांना क्षेत्रीय भेटी, शाळा सुधारणा निधी, ग्रीन स्कूल, डिजिटल क्लास रूम यासाठी निधी उपलब्ध होणार आहे.तसेच पुढील वर्षी पासून शाळा सीबीएससी होणार आहे . जिल्हा परिषद शाळा या अतिशय गुणवंत शाळा म्हणून लौकिक असून शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक यांना शैक्षणिक अनुभव मोठा असल्याने या ठिकाणी खऱ्या अर्थाने गुणवंत विद्यार्थी तयार होतात अशी माहिती सरपंच कारखिले यांनी दिली आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नरेश सोनवणे यांनी केले.तर चेअरमन दत्तात्रय कारखिले यांनी आभार मानले.

# पळवे येथे सर्व रोग महाआरोग्य शिबिर

## साईबाबा संस्थानचा पुढाकार

**पळवे खुर्द : प्रतिनिधी**



**पळवे खुर्द येथील ग्रामपंचायत,प्राथमिक आरोग्य केंद्र, मुंबई येथील भगवान महावीर समिती यांच्या सहकार्याने शिर्डी येथील साईबाबा संस्थानच्या वतीने महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री आरोग्य योजनेअंतर्गत शनिवार दि. ८ फेब्रुवारी रोजी मोफत सर्व रोग निदान महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.**

सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत पार पडणाऱ्या या शिबिरामध्ये हृदयरोग तपासणी, मेडीसीन तपासणी, हाडांचे आजार, कॅन्सर तपासणी, डोळयांचे आजार, जनरल सर्जरी तपासणी, महिलांचे आजार, रक्त तपासणी, नाक, कान, घसा तपासणी, त्वचा रोग तपासणी करण्यात येणार असून श्रवण यंत्र तसेच चष्म्यांचे वाटप करण्यात येणार आहे. विविध आजारांवर तज्ञ डॉक्टरांकडून तपासणी करून योजनेमध्ये मोफत औषधोपचार करण्यात येणार आहे. शिबिरात सहभागी होताना जुने तपासणी अहवाल घेऊन येण्याचे सुचित करण्यात आले असून जास्तीत जास्त रूग्णांनी या शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# बा.कि.भागवत यांचे निधन

## सरपंचबाबा नावाने गावात प्रसिद्ध

**टाकळी ढोकेश्वर : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यातील विरोली येथील गावचे माजी सरपंच व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे निष्ठावान कार्यकर्ते बाबा किसन भागवत यांचे वयाच्या ८२ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले.**



विरोली गावच्या विकास कामात त्यांचा मोठा सहभाग होता १९८० च्या दशकात त्यांनी सरपंच पदाची धुरा यशस्वी पणे सांभाळली विकास प्रक्रिये पासुन कोसो दूर असलेल्या गावात बाबा भागवत यांनी प्रथम विज आणून गाव प्रकाशमय केले गावात बाबा सरपंच नावाने ते प्रसिद्ध होते त्यांच्या कारकिर्दीत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचेही त्यांनी प्रामाणिक पणे काम केले . त्यांच्या निधना मुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.त्यांच्या पाश्चात तीन मुली २ मुले सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे पुणे येथील खाजगी क्लासचे शिक्षक बबन भागवत व शिवाजी भागवत यांचे ते वडील होत.

# न्यायाधीश रमले विद्यार्थ्यांमध्ये !

## आर.के. देशपांडे यांची कोहकडी शाळेला भेट

**कोहकडी : प्रतिनिधी**

**शाळा व विद्यार्थ्यांच्या अडचणी तसेच सुरक्षितता याबाबत शासनाने नेमलेल्या न्यायाधीश समितीकडून सध्या विविध शाळांची तपासणी सुरू आहे.पारनेर न्यायालयाचे न्यायाधीश आर.के.देशपांडे यांनी जिल्हयात उपक्रमशील शाळा म्हणून लौकिक असलेल्या कोहकडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला भेट देत पाहणी केली. शाळेत राबविण्यात येणारे उपक्रम समजून घेऊन विद्यार्थ्यांच्या कला गुणांचा समक्ष आनंद घेत कौतुकही केले.**

विविध गुणदर्शनात तालुका स्तरावर यश मिळविलेल्या वैयक्तिक गीत गायन, समूहगायन, वेशभूषा सादरीकरण करणाऱ्या विद्यार्थ्यांचे न्यायाधीशांनी प्रत्यक्ष सादरीकरण पाहिले. यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून जिल्हा पातळीवरील स्पर्धे साठी शुभेच्छा दिल्या.

शाळेतील नाविन्यपूर्ण प्रयोगशाळा, वस्तू भांडार, क्रीडा साहित्य, ग्रंथालय, इनट्रॅक्टीव बोर्ड, प्रोजेक्टर, संगणक, परसबागेची न्यायाधिशांनी पाहणी केली. शालेय पोषण आहाराचा आस्वाद घेऊन त्याच्या दर्जाबाबत समाधान व्यक्त केले. शाळेच्या आवारातील वीजेच्या तारा, अतिक्रमण, सी.सी.टी. व्ही. कॅमेरे, शौचालय सुविधा, क्रीडांगण याविषयी न्यायाधिशांनी तपशीलवार माहिती घेतली. शाळेत उपलब्ध असलेल्या विविध सुविधा, तुमचे शिक्षक तुमच्या सर्वांगिण विकासासाठी करीत असलेल्या प्रयत्नांचा पुरेपुर फायदा घेऊन जीवनात यशस्वी व्हावे असे आवाहन न्यायाधीश देशपांडे यांनी यावेळी विद्यार्थ्यांना केले. शिक्षक विद्यार्थ्यांसाठी करत असलेल्या प्रामाणिक प्रयत्नांबददल व सुंदर शालेय वातावरणाबाबत समाधान व्यक्त केले.



### विद्यार्थ्यांसोबतच्या सहभागाचा आनंद

न्यायालयाच्या दररोजच्या त्याच त्याच कामकाजातून शाळा व विद्यार्थ्यामध्ये सहभागी होण्याचा आनंद मिळाल्याच्या भावना न्यायाधीश देशपांडे यांनी व्यक्त केल्या. सर्वांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देत त्यांनी निरोप घेतला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर प्रत्यक्ष न्यायाधीश पाहण्याचा व त्यांच्याशी संवाद साधण्याचा दुर्मिळ संधी मिळाल्याचा आनंद दिसून येत होता.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com